# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 13/12/2019 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा अरोली येथे दिनांक 12/12/2019 चे 12:00 वा. ते 15:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– भाउराव सदाशिव बोरकर, वय 26 वर्षे, रा. अरोली हे परिवारासह बाहेर गावी गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या घराच्या दाराचा कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 7,000/–रू. व नगदी कि. 45,000/–रू. असा एकुण कि. 52,000/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ ठाकुर हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. खापरखेडा :– दि. 11/12/19 रोजी पो.स्टे. खापरखेडा येथे टपाल व्दारे मेडीकल कॉलेज नागपूर येथून श्रीमती लता रामेश्वर पाठक, वय 50 वर्ष, रा. दहेगाव रंगारी यांचे मृत्यूबाबतचे कागदपत्र प्राप्त झाल्याने पो.स्टे. खापरखेडा येथे मर्ग क्र. 59/19 कलम 174 जाफौ अन्वये नोंद आहे. सदर मर्गचे फिर्यादींना विचारपूस केली असता त्यांनी बयानात सांगीतले की, दि. 22/11/19 चे 18:00 ते 18:30 वा. दरम्यान एमएच–40/बीएन–2960 क्रमांकाची मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– प्रवीन बेलसरे, रा. कोथनी, ता. पारशिवनी याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन लता पाठक यांना धडक दिली. या अपघातात लता पाठक या जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी मेडाकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय विठठलराव कुरवडे, वय 32 वर्ष, रा. दहेगाव रंगारी खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रेवतकर हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील वांजरा येथे दिनांक 11/12/2019 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादींची बहीण नामे– प्रतीक्षा सागर मारावा व प्रतीक्षाचे पती आरोपी नामे– सागर मारावा हे पीएसी गुमथळा येथील चालक पदावर कार्यरत असून 102 ची ॲब्युलन्स गाडी क्र एमएच–31/सीक्यु–1426 चालवितात. प्रतीक्षा मारावा व सागर मारावा यांचा मुलगा नामे– रुहान मारावा, वय 2 वर्ष, हे तिघेही ॲम्बुलन्स गाडी क्र एमएच–31/सीक्यु–1426 ने गुमथळा वरुन मोहखेडी येथे जात होते. दरम्यान ॲम्बुलन्स समोर अचानक मोटरसायकल आल्याने मोटरसायकल चालकाला वाचण्यासाठी ॲम्बुलन्स चालकाने ब्रेक दाबला असता ॲम्बुलन्स चालक व त्यांची पत्नी जखमी झाले. रुहान हा त्यांचा मुलगा हा गंभीर जखमी झाल्याने त्याला पीएचसी मौदा येथे आणले असता त्याला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार देशमुख हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर